**26.11.2025** प्रभातःमुरली ओम शांती बापदादा मधुबन

“गोड मुलांनो - तुम्ही आता वर्ल्ड सर्व्हेन्ट आहात, तुम्हाला कोणत्याही गोष्टीचा देह-अभिमान येता कामा नये”

प्रश्नः- कोणती एक सवय ईश्वरीय कायद्याच्या विरुद्ध आहे? ज्यामुळे खूप नुकसान होते?

उत्तरः- कोणत्याही फिल्मी कथा ऐकणे किंवा वाचणे, कादंबऱ्या वाचणे… ही सवय एकदम नियमबाह्य आहे, याच्यामुळे खूप नुकसान होते. बाबांची सक्त मनाई आहे - मुलांनो, तुम्ही असली कोणतीही पुस्तके वाचायची नाहीत. जर कोणी बी. के. अशी पुस्तके वाचत असतील तर तुम्ही त्यांना सावध करा.

गीतः- मुखड़ा देख ले प्राणी…

ओम् शांती. गोड-गोड रूहानी मुलांप्रती रुहानी बाबा म्हणतात - स्वतःची तपासणी करा की आठवणीच्या यात्रेद्वारे आपण तमोप्रधाना पासून सतोप्रधानतेकडे कितपत पुढे गेलो आहोत कारण जितकी-जितकी आठवण कराल तितकी पापे नष्ट होत जातील. आता हे शब्द कुठे कोणत्या शास्त्र इत्यादी मध्ये लिहिलेले आहेत का? कारण ज्याने-ज्याने धर्म स्थापन केला, त्याने जे सांगितले त्याचे शास्त्र (धर्मग्रंथ) बनले आहेत ते मग वाचत बसतात. त्या ग्रंथाची पूजा करतात. आता ही देखील समजून घेण्यासारखी गोष्ट आहे, जेव्हा की हे लिहिलेले आहे. देहासहीत देहाची सर्व नाती सोडून स्वतःला आत्मा समजा. बाबा आठवण करून देतात - तुम्ही मुले पहिले अशरीरी आला होता, तिथे तर पवित्रच राहतात. मुक्ती-जीवनमुक्ती मध्ये पतित आत्मा कोणी जाऊ शकत नाही. ती आहे निराकारी, निर्विकारी दुनिया. याला म्हटले जाते साकारी विकारी दुनिया मग सतयुगामध्ये हीच निर्विकारी दुनिया बनते. सतयुगामध्ये राहणाऱ्या देवतांची तर खूप महिमा आहे. आता मुलांना सांगितले जाते - चांगल्या रीतीने धारण करून इतरांना समजावून सांगा. तुम्ही आत्मे जिथून आला आहात, पवित्रच आला आहात. मग इथे येऊन अपवित्र देखील जरूर बनायचे आहे. सतयुगाला व्हाईसलेस वर्ल्ड, कलियुगाला विशश वर्ल्ड (विकारी दुनिया) म्हटले जाते. आता तुम्ही पतित-पावन बाबांची आठवण करता की आम्हाला पावन व्हाईसलेस बनविण्याकरिता तुम्ही विशश दुनियेमध्ये, विशश शरीरामध्ये (विकारी दुनियेमध्ये, विकारी शरीरामध्ये) या. बाबा स्वतः बसून समजावून सांगतात - ब्रह्माच्या चित्रावरच गोंधळतात की दादांना का बसवले आहे. सांगितले पाहिजे हे तर भागीरथ आहेत. शिव भगवानुवाच आहे - हा रथ मी घेतला आहे कारण मला प्रकृतीचा आधार जरूर पाहिजे. नाहीतर मी तुम्हाला पतितापासून पावन कसे बनवू. रोज शिकवायचे देखील जरूर आहे. आता बाबा तुम्हा मुलांना म्हणतात - स्वतःला आत्मा समजून मामेकम् (मज एकाची) आठवण करा. सर्व आत्म्यांना आपल्या पित्याची आठवण करायची आहे. श्रीकृष्णाला सर्व आत्म्यांचा पिता म्हणणार नाही. त्याला तर त्याचे आपले शरीर आहे. तर हे बाबा खूप सोपे करून सांगतात - जेव्हा पण कोणाला समजावून सांगाल तर बोला - बाबा म्हणतात तुम्ही अशरीरी आलात, आता अशरीरी बनून जायचे आहे. तिथून पवित्र आत्माच येते. भले उद्या जरी कोणी वरून येतात तर ते देखील पवित्र असतात, तर त्यांची महिमा जरूर होईल. संन्याशी, उदासी, गृहस्थी ज्यांचे नाव प्रसिद्ध असते, जरूर त्यांचा हा पहिला जन्म आहे ना. त्यांना यायचेच आहे धर्म स्थापन करण्याकरिता. जसे बाबा गुरुनानकांच्या बाबतीत सांगतात. आता ‘गुरु’ शब्द देखील बोलावा लागतो कारण ‘नानक’ नाव तर अनेकांचे आहे ना. जेव्हा कोणाची महिमा केली जाते तर त्या अर्थाने असे गुरु म्हटले जाते. असे म्हटले नाही तर ते चांगले नाही. वास्तविक मुलांना समजावून सांगितले आहे - एका बाबांशिवाय, कोणीही गुरु नाहीत. ज्यांच्या नावाची महिमा गातात - ‘सद्गुरु अकाल…’ ते अकालमुर्त आहेत अर्थात ज्याला काळ खात नाही, ती आहे आत्मा, तर या कथा इत्यादी बसून बनवल्या आहेत. फिल्मी कहाण्यांची पुस्तके, कादंबऱ्या इत्यादी खूप वाचतात. बाबा मुलांना खबरदार करतात. तुम्ही कधी कोणत्या कादंबऱ्या इत्यादी वाचायच्या नाहीत. काहीजणांना सवय असते. इथे तर तुम्ही सौभाग्यशाली बनता. कोणी बी. के. देखील कादंबऱ्या वाचतात म्हणून बाबा सर्व मुलांना सांगतात - कधीही कोणाला कादंबरी वाचताना पाहाल तर लगेच काढून घेऊन फाडून टाका, यामध्ये घाबरायचे नाही. आपल्याला कोणी शाप देऊ नये किंवा कोणी आपल्यावर रागावू नये, अशी काही गोष्ट नाही. तुमचे काम आहे - एक-दोघांना सावध करणे. चित्रपटाच्या कहाण्या ऐकणे किंवा वाचणे नियमबाह्य आहे. नियमबाह्य कोणते वर्तन असेल तर

लगेच रिपोर्ट केला पाहिजे. नाही तर सुधारणार कसे? आपलेच नुकसान करत राहतील. स्वतःमध्येच योगबळ नसेल तर इथे बसून कसे शिकवाल? बाबांची मनाई आहे. जर पुन्हा असे काम कराल तर आतल्याआत मन जरूर खात राहील. आपलेच नुकसान होईल त्यामुळे जर कोणामध्ये कोणता अवगुण बघितलात तर तसे बाबांना लिहिले पाहिजे. कोणते नियमबाह्य वर्तन तर करत नाहीत ना? कारण ब्राह्मण यावेळी सर्व्हंट (सेवाधारी) आहेत ना. बाबा देखील म्हणतात - 'मुलांनो, नमस्ते'. अर्थासहित समजावून सांगतात. शिकवणाऱ्या ज्या मुली आहेत त्यांना देह-अभिमान येता कामा नये. टीचर देखील विद्यार्थ्यांचा सेवक असतो ना. गव्हर्नर इत्यादी देखील पत्र लिहितात तर, खाली सही करतात - 'मी एक आज्ञाधारक सेवक', आणि याच्या अगदी समोर नाव लिहितील. बाकीचे लिहिणार क्लार्क आपल्या हाताने. कधी स्वतःचा मोठेपणा लिहिणार नाहीत. आजकाल गुरु तर स्वतःच स्वतःला 'श्री-श्री' लिहितात. इथे देखील कोणी असे आहेत - श्री अमका लिहितात. वास्तविक असे देखील लिहिता कामा नये. ना फिमेल श्रीमती लिहू शकते. श्रीमत तेव्हा मिळेल जेव्हा श्री-श्री स्वतः येऊन मत देतील. तुम्ही सांगू शकता की जरूर कोणाच्या मताद्वारे हे (देवता) बनले आहेत ना. भारतामध्ये कोणालाही हे माहीत नाहीये की हे इतके श्रेष्ठ विश्वाचे मालक कसे बनले. तुम्हाला तर हाच नशा चढला पाहिजे. हे एम ऑब्जेक्टचे चित्र (बॅज) नेहमी छातीवर लावलेले असावे. कोणालाही सांगा - आम्हाला स्वयं भगवान शिकवत आहेत, ज्याद्वारे आम्ही विश्वाचे महाराजा बनतो. बाबा आले आहेत या राज्याची स्थापना करण्याकरिता. या जुन्या दुनियेचा विनाश समोर उभा आहे. तुम्ही छोट्या-छोट्या मुली तोतऱ्या भाषेत कोणालाही समजावून सांगू शकता. मोठ-मोठी सम्मेलने इत्यादी होतात, तिथे तुम्हाला बोलावतात. तर हे चित्र तुम्ही घेऊन जा आणि बसून समजावून सांगा. भारतामध्ये पुन्हा यांचे राज्य स्थापन होत आहे. कुठेही भरलेल्या सभेमध्ये तुम्ही समजावून सांगू शकता. पूर्ण दिवसभर सेवेचाच नशा राहिला पाहिजे. भारतामध्ये यांचे राज्य स्थापन होत आहे. बाबा आम्हाला राजयोग शिकवत आहेत. शिव भगवानुवाच - 'माझ्या मुलांनो, तुम्ही स्वतःला आत्मा समजून माझी आठवण करा'. तर तुम्ही २१ पिढी करिता असे बनाल. दैवी गुण देखील धारण करायचे आहेत. आता तर सर्वांचे आसुरी गुण आहेत. श्रेष्ठ बनविणारे तर एकच श्री श्री शिवबाबा आहेत. तेच उच्च ते उच्च बाबा आम्हाला शिकवत आहेत. शिव भगवानुवाच, मनमनाभव. भागीरथ तर प्रसिद्ध आहे. भागीरथालाच ब्रह्मा म्हटले जाते, ज्यांना महावीर देखील म्हटले जाते. इथे दिलवाडा मंदिरामध्ये बसलेले आहेत ना. जैनी इत्यादी जे मंदिर बनवणारे आहेत ते कोणीही हे जाणतात थोडेच. तुम्ही छोट्या-छोट्या मुली कोणा बरोबरही व्हीजिट घेऊ शकता. आता तुम्ही अतिशय श्रेष्ठ बनत आहात. हे भारताचे एम ऑब्जेक्ट आहे ना. किती नशा चढला पाहिजे. इथे बाबा चांगल्याप्रकारे नशा चढवतात. सर्वजण म्हणतात आम्ही तर लक्ष्मी-नारायण बनणार. राम-सीता बनण्यासाठी कोणीही हात उचलत नाहीत. आता तर तुम्ही आहात अहिंसक, क्षत्रिय. तुम्हा अहिंसक क्षत्रियांना कोणीही जाणत नाहीत. हे तुम्हाला आता समजते आहे. गीतेमध्ये देखील शब्द आहे - 'मनमनाभव'. स्वतःला आत्मा समजा. ही तर समजण्याची गोष्ट आहे ना, इतर कोणीही समजू शकत नाही. बाबा बसून मुलांना शिकवण देतात - मुलांनो, आत्म-अभिमानी बना. ही सवय तुमची मग २१ जन्मांपर्यंत चालते. तुम्हाला शिकवण मिळतेच मुळी २१ जन्मांकरिता.

बाबा वारंवार मुख्य गोष्ट समजावून सांगतात - स्वतःला आत्मा समजून बसा. परमात्मा बाबा आम्हा आत्म्यांना बसून समजावून सांगत आहेत, तुम्ही पुन्हा-पुन्हा देह-अभिमानामध्ये येता मग घरदार इत्यादी आठवते. असे होते. भक्तीमार्गामध्ये देखील भक्ती करता-करता बुद्धी इतरत्र निघून जाते. एकटक केवळ नवधा भक्ती करणारेच बसू शकतात, ज्याला कडक भक्ती म्हटले जाते. एकदम लवलीन होऊन बसतात. तुम्ही जसे आठवणीमध्ये बसता तर काही काळ एकदम अशरीरी बनता. जी चांगली मुले असतील - तीच अशा अवस्थेमध्ये बसतील. देहाचे भान निघून जाईल. अशरीरी होऊन त्या मस्तीमध्ये बसून राहतील. ही सवय पक्की होईल. संन्यासी आहेत तत्त्व ज्ञानी किंवा ब्रह्म ज्ञानी. ते म्हणतात - आम्ही लीन होणार. हे जुने शरीर सोडून ब्रह्म तत्त्वामध्ये लीन होणार. सर्वांचा आपापला धर्म आहे ना. कोणीही दुसऱ्या धर्माला मानत नाहीत. आदि सनातन देवी-देवता धर्माचे देखील तमोप्रधान बनले आहेत. गीतेचे भगवान कधी आले होते? गीतेचे युग कधी होते? कोणीही जाणत नाहीत. तुम्ही जाणता या संगमयुगावरच बाबा येऊन राजयोग शिकवतात. तमोप्रधानापासून सतोप्रधान बनवतात. भारताचीच गोष्ट आहे. अनेक धर्म देखील होते जरूर. गायन आहे - 'एका धर्माची स्थापना, अनेक धर्मांचा विनाश'. सतयुगामध्ये होता एक धर्म. आता कलियुगामध्ये आहेत अनेक धर्म. पुन्हा आता एका धर्माची स्थापना होते. एक धर्म होता, आता नाही आहे. बाकी सर्व धर्म अस्तित्वात आहेत. वडाच्या झाडाचे उदाहरण देखील अगदी बरोबर आहे. झाडाचे फाउंडेशन राहिलेले नाहीये. बाकी सगळे झाड उभे आहे. तसे यामध्ये

देखील देवी-देवता धर्म राहिलेला नाहीये. आदि सनातन देवी-देवता धर्म जो बुंधा होता - तो आता प्राय: लोप झाला आहे. बाबा पुन्हा एकदा त्याची स्थापना करत आहेत. बाकीचे एवढे सर्व धर्म तर नंतर आले आहेत; चक्राला जरूर पुन्हा रिपीट व्हायचे आहे अर्थात जुन्या दुनियेपासून मग नवीन दुनिया होणार आहे. नवीन दुनियेमध्ये यांचे राज्य होते. तुमच्याकडे मोठी चित्रे देखील आहेत, छोटी देखील आहेत. मोठी वस्तू असेल तर पाहून विचारतील - हे काय आणले आहे. बोला आम्ही ती वस्तू आणली आहे, ज्याद्वारे मनुष्य बेगर टू प्रिन्स बनतात. मनामध्ये खूप उमंग, खूप आनंद झाला पाहिजे. आपण आत्मे भगवंताची मुले आहोत. आत्म्यांना स्वयं भगवान शिकवत आहेत. बाबा आम्हाला डोळ्यांच्या पापण्यांवर बसवून घेऊन जातात. या छी-छी दुनियेमध्ये (विकारी दुनियेमध्ये) आम्हाला रहायचे नाही आहे. पुढे चालून त्राही-त्राही करतील, काही विचारू नका. करोडोंनी माणसे मरतात. हे तर तुम्हा मुलांच्या बुद्धीमध्ये आहे. आम्ही या डोळ्यांद्वारे जे काही पाहत आहोत हे काहीच राहणार नाही आहे. इथे तर मनुष्य काट्यांप्रमाणे आहेत. सतयुग आहे फुलांचा बगीचा. मग आपले डोळेच शीतल होतील. बागेमध्ये गेल्याने नेत्र थंड शितल होतात ना. तर तुम्ही आता पद्मापदम भाग्यशाली बनत आहात. ब्राह्मण जे बनतात त्यांच्या पावलांमध्ये पद्म आहे. तुम्हा मुलांनी समजावून सांगितले पाहिजे - आम्ही हे राज्य स्थापन करत आहोत, म्हणून बाबांनी बॅज बनवून घेतले आहेत. पांढरी साडी घातलेली असावी, बॅज लावलेला असावा, याद्वारे स्वतःच सेवा होत राहील. मनुष्य गातात - ‘आत्मा परमात्मा अलग रहे बहुकाल…’ परंतु ‘बहुकाल (खूप काळ)’ याचा अर्थ कोणीही समजत नाहीत. तुम्हाला बाबांनी सांगितले आहे की, खूप काळ अर्थात ५ हजार वर्षानंतर तुम्ही मुले बाबांना भेटता. तुम्ही हे देखील जाणता की, या सृष्टीमध्ये सर्वात प्रसिद्ध हे राधे-कृष्ण आहेत. हे सतयुगाचे फर्स्ट प्रिन्स-प्रिन्सेस आहेत. कधी कोणाच्या डोक्यातही येणार नाही की हे कुठून आले. सतयुगाच्या पूर्वी जरूर कलियुग असेल. त्यांनी असे कोणते कर्म केले जे विश्वाचे मालक बनले. भारतवासी काही यांना विश्वाचे मालक समजत नाहीत. यांचे जेव्हा राज्य होते तेव्हा भारतामध्ये इतर कोणताही धर्म नव्हता. आता तुम्ही मुले जाणता - बाबा आम्हाला राजयोग शिकवत आहेत. आमचे एम ऑब्जेक्ट हे आहे. भले मंदिरांमध्ये यांची चित्रे इत्यादी आहेत. परंतु हे थोडेच समजतात की यावेळी ही स्थापना होत आहे. तुमच्यामध्ये देखील नंबरवार समजतात. कोणी तर एकदमच विसरून जातात. असे वर्तन होते जसे अगोदर होते. इथे तर खूप चांगले समजून घेतात, इथून बाहेर गेले आणि खलास. सेवेची आवड असली पाहिजे. सर्वांना हा संदेश देण्याची युक्ती रचावी. मेहनत करायची आहे. नशेने सांगितले पाहिजे - शिवबाबा म्हणतात माझी आठवण करा तर पापे नष्ट होतील. आम्ही एका शिवबाबांव्यतिरिक्त इतर कोणाचीही आठवण करत नाही. अच्छा!

गोड-गोड खूप-खूप वर्षानंतर भेटलेल्या मुलांप्रती मात-पिता बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात. आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेसाठी मुख्य सारांश:-

१) एम ऑब्जेक्टचे चित्र नेहमी सोबत ठेवायचे आहे. नशा रहावा की आता आपण श्रीमतावर विश्वाचे मालक बनत आहोत. आम्ही अशा फुलांच्या बगीच्यामध्ये जातो - जिथे आमचे नेत्र शितल होतील.

२) सेवेची अतिशय आवड असली पाहिजे. मोठ्या मनाने किंवा उमंगाने मोठ-मोठ्या चित्रांवर सेवा करायची आहे. बेगर टू प्रिन्स बनायचे आहे.

वरदान:- कर्मांच्या गतीला जाणून गती-सद्गतीचा निर्णय करणारे मास्टर दुःख हर्ता सुख कर्ता भव अजूनही आपली जीवन गाथा पाहण्यामध्ये आणि ऐकविण्यामध्ये बिझी राहू नका, परंतु प्रत्येकाच्या कर्माच्या गतीला जाणून गती-सद्गती देण्याचा निर्णय घ्या. मास्टर दुःख-हर्ता, सुख-कर्ताचा पार्ट बजावा. आपल्या रचनेच्या दुःख-अशांतीच्या समस्यांना समाप्त करा, त्यांना महादान आणि वरदान द्या. स्वतः सुविधा घेऊ नका, आता तर दाता बनून द्या. जर सुविधांच्या आधारावर स्वतःची उन्नती किंवा सेवेमध्ये अल्प काळाकरिता सफलता जरी प्राप्त झाली, तरीही आज महान असाल आणि उद्या महानतेसाठी तहानलेले आत्मा बनाल.

बोधवाक्य:- अनुभूती न होणे - युद्धाची स्टेज आहे; योगी बना, योध्दे नाही.

||| ओम शांती |||

अव्यक्त इशारे:- अशरीरी आणि विदेही स्थितीचा अभ्यास वाढवा. जसे ब्रह्मा बाबा अव्यक्त बनून विदेही स्थिती द्वारे कर्मातीत बनले, तर अव्यक्त ब्रह्माच्या विशेष पालनेसाठी पात्र आहात; म्हणून अव्यक्त पालनेचा प्रतिसाद विदेही बनून द्या. सेवा आणि स्थितीचा बॅलन्स ठेवा. विदेही अर्थात देहा पासून न्यारा. स्वभाव, संस्कार, दुर्बलता हे सर्व देहासोबत आहे आणि देहा पासून न्यारा झाला तर तो सर्वांपासून न्यारा झाला, म्हणून ही ड्रिल खूप सहयोग देईल, यामध्ये कंट्रोलिंग पॉवर पाहिजे.